# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

## निक्षय मित्र

उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील क्षयरुग्णांना मदत उपलब्ध करुन देण्यासाठी उद्योगसमृध्द, स्वयंसेवा संख्या व दानशूरांनी पुढे यावे असे आवाहन उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

भारत सरकारने सन २०२५ पर्यंत देशाला क्षयरोग मुक्त करण्याचे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवले आहे. त्या अनुषंगाने शासन क्षयरुग्णांना वेगवेगळया पध्दतीने मदत देऊन त्यांना औषधोपचार मिळवून देवून त्यांना ओषधोपचार मिळवून देत आहे. उपचारावर असणा-या क्षयरुग्णांना शासनमार्फत प्रत्येक महिन्यात निक्षय पोषण यांजने अंतर्गत ५०० रुपयांची मदत थेट बँक खात्यामध्ये दिली जात आहे. परंतु या व्यतिरिक्त क्षयरुग्णांना अतिरिक्त मदत देण्यासाठी केंद्र शासनामार्फत प्रधानमंत्री क्षयरोग मुक्त भारत हा उपक्रम राबविण्यात येत असून या उपक्रमांतर्गत क्षयरुग्णांना अतिरिक्त पोषण आहार, डायग्नोस्टिक मदत, व्होकेशनल मदत या स्वरुपातील मदत उदयोग समुह, सामाजिक संस्था व दानशूर यांनी करावी असे मा. श्री. अजीज शेख, आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे. वैद्यकीय आरोग्य विभाग मुख्यालय dtomhumc@rntcp.org या ई-मेल आयडीवर निक्षय मित्र म्हणून संपर्क साधावा आणि राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमाला सहकार्य करुन एकजुटीने हातभार लावावा. असे आवाहन उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी

उल्हासनगर महानगरपालिका